**विशेष दिवाणी दावा क्र. १२४/२०२५ मधील निशाणी १७ वरील आदेश.**
(भुपाल श्रीधर भिलवडे व इतर वि. श्री.सुर्यकांत निवृत्ती कणसे व इतर)
**(CNR No.MHSN02-000807-2025)**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी त्यांच्या विरुध्द झालेला विना कैफीयत हुकूम रद्द होवून कैफीयत दाखल करणेस परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

**अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे** –

२. सदरचा दावा वादींनी प्रतिवादीं विरुध्द देय रक्कम वसुल होऊन मिळणेकरिता दाखल केलेला आहे. प्रस्तुत प्रतिवादंनी दावेस कैफियत देणेकरिता विशिष्ठ कालावधी नेमलेला असतो याबाबत कायदेशीर ज्ञान नव्हते. प्रतिवादींनी वकीलांची नेमणूक केलेनंतर त्यांना हि बाब समजून आली. प्रतिवादी क्र. १ व २ हे शेतकरी असून अवकाळी पावसामुळे शेतातील कामात अडकून पडले होते तसेच प्रतिवादी क्र. ३ हे व्यापारी असून मागील ३ ते ४ महिने सणासुदीचे असल्याकरणामुळे त्यांना कामातून वेळ काढुन वकीलांना भेटुन त्यांना दावेस कैफियत देणेकामी आवश्यक त्या सुचना व माहिती देता न आलेने कैफियत दाखल करणे शक्य झाले नाही. सदर दावेकामी प्रतिवादींची कैफियत दाखल झालेस दावा गुण–दोषांवर निर्णित होणेस मदत होणार आहे. प्रतिवादींना या दावेकामी यश येणेबाबत खात्री आहे. सबब, खरी वस्तुस्थिती कोर्टासमोर येणेकरिता प्रस्तुत

प्रतिवादींची कैफियत रेकॉर्डवरती घेणे आवश्यक आहे. सदरचा अर्ज मंजूर झालेस वादींचे कोणतेही कसलेही नुकसान होणार नाही. परंतू, सदरचा अर्ज नामंजूर झालेस प्रतिवादींचे कधीही पैशात भरुन न येणारे अतोनात नुकसान होणार आहे. या व इतर कारणांवरुन प्रतिवादींनी अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

३. प्रस्तुत अर्जास वादी यांनी निशाणी क्र. १८ वर म्हणणे सादर करुन अर्जास विरोध दर्शविला आहे. वादी यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी यांना दावा समन्सची बजावणी दिनांक ३०/०७/२०२५ पूर्वीच झालेली आहे. त्याप्रमाणे वकील नेमणुक करुन प्रतिवादी क्र. १ ते ३ हे दिनांक ३०/०७/२०२५ रोजी हजर झालेले आहेत. त्यानंतर नेमलेल्या बऱ्याच तारखा होऊन देखील त्यांनी त्यांची कैफियत दाखल केली नाही. प्रस्तुत दाव्यास कैफियत दाखल करण्यास प्रतिवादी यांना सुमारे ५ महिन्यांचा विलंब झालेला आहे. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जामध्ये दिलेली कारणे हि संयुक्तीक नाहीत. सबब, प्रस्तुत प्रतिवादी यांच्यावर र.रु.१०,०००/– खर्च बसवून प्रस्तुतचा अर्ज फेटाळणेत यावा अशी विनंती केली.

४. दोन्ही विद्वान विधीज्ञांचा सविस्तर युक्तीवाद ऐकण्यात आला. युक्तीवादाच्या अनुषंगाने संचिकेचे अवलोकन केल्यास असे दिसून येते की, प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना समन्स लागू झालेनंतर प्रस्तुत कामी ते दिनांक ३०/०७/२०२५ रोजी हजर झाले. परंतु मुदतीत त्यांनी त्यांची कैफियत दाखल केली नाही. त्यामुळे त्यांच्याविरुध्द दिनांक १७/१०/२०२५ विनाकैफियत आदेश पारीत करण्यात

आला. असे असले तरी प्रस्तुत दाव्यात वादी यांनी रक्कम वसूल होऊन मिळणेकरिता दाखल केलेला आहे. त्यामुळे प्रतिवादींना आपले म्हणणे मांडण्याची संधी देणे गरजेचे वाटते. तसेच, दावा गुणदोषावर चालून वादी–प्रतिवादी मधील सर्व वादप्रश्न एकाच दाव्यात निकाली काढण्यास न्यायालयासही मदत होईल. प्रस्तुत प्रतिवादी यांना निश्चितच कैफीयत दाखल करण्यास विलंब झालेला आहे. केवळ विलंब झाला आहे म्हणून कैफीयत नाकारणे न्यायोचित होणार नाही. त्यामुळे कैफियत दाखल करुन घेतल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट अर्ज नामंजूर केल्यास प्रतिवादींना त्यांचे म्हणणे मांडता येणार नाही परिणामी त्यांचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. असे असताना, कैफियत दाखल करण्यास झालेल्या विलंबाबाबत प्रतिवादी क्रमांक १ ते ३ यांचेवर खर्च बसवून प्रस्तुत अर्ज मंजूर करणे न्यायोचित वाटते. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

:: **आदेश** ::

१. अर्ज नि.१७ मंजूर करण्यात येतो.

२. अर्जाचा खर्च म्हणून प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी वादींना रक्कम रु.१०००/– द्यावेत.

VIBHA PRAKASH GAIKWAD
Digitally signed by VIBHA PRAKASH GAIKWAD
Date: 2026.02.06 10:40:43 +0530

सांगली. (विभा प्र. गायकवाड)

दि. ०५/०२/२०२६ सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, सांगली.